**<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९, नियम १ व २ अन्वये दिला असून त्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

२. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ हे आपसात नातेवाईक असून एकत्र कुटुंबातील अविभक्त घटक आहेत व ते मयत आप्पा पळसकर यांचे वारस आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांना मौजे खामगाव, ता.बदनापूर येथील गट क्र. १० एकूण क्षेत्रफळ ५ हे ३६ आर, गट क्र. १९ एकूण क्षेत्रफळ ९ हे ७४ आर (पोट खराब १९ आर सह) आणि गट क्र. २० एकूण क्षेत्रफळ ३ हे ९८ आर (पोट खराब ७ आर सह) पैकी ८९ आर या एकत्र कुटूंबाच्या मिळकती सद्यस्थितीत कुटुंब व्यवस्था म्हणून व कागदोपत्री वादी व प्रतिवादी यांच्या नावाने नोंद ठेवण्यात आली आहे. गट क्र.१० मधील जमिनीच्या चतु:सिमा या पुर्वेस—दगडु, श्रीराम आणि बाबाशहा यांच्या जमीन, पश्चिमेस—विठ्ठल, अनिल आणि सुनिल यांच्या जमिनी, उत्तरेस—गट क्र.१९, दक्षिणेस— नदी अशा आहेत. तसेच गट क्र.१९ च्या चतु:सिमा या पुर्वेस— गट क्र.२०, पश्चिमेस—विश्वनाथ आसोले यांची जमीन, उत्तरेस—गट क्र.१९ मधील नवगीरे यांची जमीन व दक्षिणेस— गट क्र.१० अशा आहेत. गट क्र.२० मधील ८९ आर जमीनीच्या चतु:सिमा या पुर्वेस— पाझर तलाव, पश्चिमेस—विठ्ठल, अनिल आणि सुनिल यांच्या जमिनी, उत्तरेस—गट क्र. फकीरशहा याची जमीन व दक्षिणेस— कचरू कदम याची जमीन अशा आहेत. (इथुन यास पुढे वाद मिळकत असे संबोधण्यात येईल.) वादीच्या म्हणण्यानुसार आजरोजी महसुली अभिलेखात किंवा ७/१२ उता—यांच्या नोंदीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या नावे जमिनीची नोंद नमुद असली तरीही त्यानुसार जमीन त्यांच्या ताब्यात नाही. वाद मिळकत ही आजही एकत्रित व अविभक्त आहे. परंतू कौटुंबिक व्यवस्था म्हणून ७/१२ उता—यावर नामधारी नोंदी करण्यात आल्या

आहेत. वादी मिळकतीच्या अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत.

३ वादीने वेळोवेळी प्रतिवादी क्र.१ ते ९ यांना वाटणी करून देण्याची विंनती केली परंतू सर्व प्रतिवादी क्र.१ ते ९ हे त्यास टाळाटाळ करीत राहिले आहेत. गट क्र.१० मध्ये प्रतिवादी क्र.१० च्या नावे असलेली नोंद चुकीची आहे. त्याबाबत कुठलाही फेरफार मंजूर नाही. प्रतिवादी क्र.१० हा गावातील तलाठयाकडे कोतवाल म्हणून कामास होता. त्याने महसूल खात्यातील अधिका—यांसोबतच्या संबंधाचा गैरफायदा घेत महसुल अभिलेखात चुकीच्या नोंदी घेवून स्वत:चे नाव गट क्र.१० च्या ७/१२ उता—यावर लावून घेतले आहे. वस्तुत: सदर जमिनीवर त्याचा कुठल्याही प्रकारे मालकी हक्क व ताबा नव्हता. वादी किंवा त्याच्या पुर्वजांनीही प्रतिवादी क्र.१०यास सदर जमीन विक्री केलेली नाही. त्यामुळे ७/१२ उता—यामध्ये त्याच्या नावाची नोंद घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. वादी हा सदर नोंदीस उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल करणार आहे.

४ वादी यास शेतीशिवाय उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन नाही. तसेच त्याचा कोणताही जोडधंदा नाही. त्याचे संपुर्ण कुटुंब हे शेतीच्या उत्पन्नावरच अवलंबून आहे. सर्व प्रतिवादी हे आपसात संगनमत करून वाद मिळकत विक्री करण्याच्या तयारीत आहेत. म्हणून त्याने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करून प्रतिवादींना वाद मिळकत विक्री करण्यापासून रोखण्याची विनंती केली आहे.

५ दाव्याकामी प्रतिवादी क्र.१ ते ९ हजर होवून त्यांनी आपले म्हणणे व लेखी जवाब नि. २५ वर दाखल केला. त्यात त्यांनी आपसातील नातेसंबंध मान्य केले परंतू ते हिंदु एकत्र कुटुंबातील अविभक्त घटक आहेत हे अमान्य केले. त्यांच्या म्हणण्यानुसार वाद मिळकतीची कुटुंब व्यवस्था म्हणून कागदोपत्री

नोंद करण्यात आलेली नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या जमिनी वेगवेगळया आहेत. वादी हा एकत्र कुटुंबातील घटक नाही. त्यांनी असे म्हटले आहे की, वादी व प्रतिवादी यांच्या वडीलांमध्ये वाद मिळकतीच्या अगोदरच वाटण्या झालेल्या आहेत व त्यांच्या जमिनी वेगवेगळया आहेत व त्यानुसार त्यांचे आपसात फेरफार झालेले आहेत, जे आजपर्यत आव्हानीत केलेले नाहीत. त्याने दाखल केलेल्या कागदपत्रावरूनच सिध्द होते की, वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंब नाही. तसेच वादी मिळकत ही एकत्र कुटुंबाची मिळकत नाही. त्याने खोटया माहितीच्या आधारावर प्रस्तुतचा अर्ज व दावा दाखल केला आहे. याकारणास्तव प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

६ प्रतिवादी क्र.१० याने आपले म्हणणे व लेखी जवाब नि. २१ वर दाखल केले. त्याच्या म्हणण्यानुसार गट क्र.१० मधील १ हे ७६ आर जमीन ही त्याने नोंदणीकृत विक्रीपत्राआधारे महादु बाळा कोळस्कर याच्याकडून खरेदी केली असून ती त्याच्या ताब्यात आहे. व त्या आधारे त्याच्या नावे फेरफार क्र.९९९९ मंजूर झाला आहे. वादीने सदर फेर हा अद्यापपावेतो सक्षम न्यायालयाकडे आव्हानीत केलेला नाही. त्यामुळे तिचा वाद मिळकतीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे सदर जमिनीबाबत वादीला प्रतिवादी क्र.१० याच्या मालकीबाबत आव्हान देण्याचा कुठलाही अधिकार नाही. वादीने प्रस्तुतचा मुदतबाहय दावा दाखल केला आहे. त्याला सदर दावा दाखल करण्याचा कुठलाही अधिकार नाही. याकारणास्तव त्याने प्रस्तुतचा अर्ज व दावा खर्चासह नामंजूर करण्याची विंनती केली आहे.

७. उभय पक्षकारांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे माझया विचारार्थ निघाले. त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने झुकतो आहे काय ? | नाही. |
| ३. | त्याच्या हक्कात मनाई हुकुम पारीत न केल्यास त्यास अपरिमीत हानी पोहोचेल काय ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | अर्ज नामंजुर करण्यात येतो |

## कारणमिमांसा

८ आपल्या कथनापुष्टयर्थ वादीने खामगाव येथील गट क्र.१०, १९ व २० च्या ७/१२ उता—यांच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. प्रतिवादींनी आपल्या कथनापुष्टयर्थ कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

### मुद्दा क्र. १ ते ३ साठी

९. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितपणे केली आहे. वादीच्या म्हणण्यानुसार वाद मिळकत ही त्याची व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांची वडीलोपार्जित एकत्र कुटुंबाची मिळकत आहे व प्रतिवादी हे आपसात संगनमत करून तिची विक्री करण्याच्या तयारीत आहेत. त्याच्या म्हणण्यानुसार वाद मिळकतीच्या अद्यापपावेतो वाटण्या झालेल्या नाहीत. परंतू त्याने दाखल केलेल्या गट क्र.१० च्या ७/१२ उता—यामध्ये प्रतिवादी क्र. २, ६, ७, ४, ५ व ८ यांच्या नावे प्रत्येकी ३० आर इतके क्षेत्र दिसून येते. तसेच वादीच्या नावे ४५ आर व प्रतिवादी क्र.१ याच्या नावे ४५ आर व प्रतिवादी क्र.३ हिच्या नावे ९० आर इतके क्षेत्र दिसून येते. तसेच त्याने दाखल केलेल्या गट क्र.१९ च्या ७/१२ उता—याचे अवलोकन करता त्यात प्रतिवादी क्र.२, ४, ५ व ६ यांच्या नावे प्रत्येकी १ हे ०४ आर इतकी जमीन दिसून येते. याच गटामध्ये प्रतिवादी क्र.१ याच्या नावे ८१ आर इतकी जमीन दिसून येते. व

प्रतिवादी क्र.३ हिच्या नावे २ हे ४६ आर व वादीच्या नावे ०.८२ आर इतकी जमीन असल्याचे दिसून येते. या दोनही ७/१२ उता—यांचे अवलोकन करता त्यात उभय पक्षकारांच्या वाटण्या झाल्याचे दिसून येते. त्यातील नोंदी या सामाईक नसून त्या प्रत्येकाच्या नावाने वेगवेगळया आहेत. ज्यामुळे वादीच्या सदर मिळकत एकत्र असल्याबाबतच्या कथनास छेद मिळतो.

१० वादीच्या म्हणण्यानुसार गट क्र.१० मध्ये प्रतिवादी क्र.१०याच्या नावे असलेली नोंद ही नामधारी व कागदोपत्री आहे. त्याच्या ताब्यात प्रत्यक्ष क्षेत्र नाही. सदर गट क्र.१० च्या ७/१२ उता—याचे अवलोकन करता त्यात प्रतिवादी क्र.१० याच्या नावे १ हे. ७६ आर जमिनीची नोंद दिसून येते. यासंदर्भात वादीने म्हटले आहे की, प्रतिवादी क्र.१० हा तलाठयाकडे कोतवाल म्हणून कामास होता. त्याचा गैरफायदा घेत त्याने स्वत:चे नाव गट क्र.१० च्या ७/१२ उता—यावर लावून घेतले. परंतू प्रतिवादी क्र.१० याने म्हटले आहे की, सदर जमीन ही त्याने गेल्या ५० वर्षापूर्वी खरेदी केली आहे व तेव्हापासून त्यावर त्याची मालकी हक्कान्वये वहिती व ताबा आहे. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा वादी यास प्रतिवादी क्र. १० याच्या नावे झालेल्या नोंदीबाबत आक्षेप होता तेव्हा त्याने सदर नोंदीस अद्यापपावेतो आव्हानीत केल्याचे दिसून येत नाही. या उलट त्याने म्हटले आहे की, तो सदर नोंदीस आव्हानीत करत आहे. यावरून हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.१० याच्या नावे फेरफार नोंद झाली आहे व ती अद्यापपावेतो कायम आहे. यावरून सदर जमीन ही प्रतिवादी क्र. १० याच्या वहिती व ताब्यात असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

११ वादीच्या म्हणण्यानुसार वाद मिळकतीच्या संदर्भात तो व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्या नावे झालेल्या नोंदी या नाममात्र आहेत व त्यांच्यात अद्यापपावेतो सरसनिरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत. परंतू याकामी वादीने ज्या फेरफार अन्वये सदर नोंदी झाल्या त्यांच्या प्रती दाखल केलेल्या नाहीत. त्यामुळे उभय पक्षकारांमध्ये सरस निरस मानाने वाटण्या झाल्या नाहीत हे वादीचे

कथन विश्वासार्ह वाटत नाही.

१२. उपरोक्त कारणमिमांसेवरुन तसेच वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्यात आपसात वाटण्या झाल्याचेही सकृतदर्शनी दिसुन येते. तसेच त्याने सातबारा उता—यावर प्रतिवादींच्या नावे असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेउन प्रतिवादींनी वाद मिळकत विक्री करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम मागितला आहे. परंतू वादीने प्रतिवादी हे वाद मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत याविषयी सकृतदर्शनी पुरावा दाखल केला नाही. याबाबत केवळ त्याच्या कथनांवर भिस्त ठेवणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे वादीची ही विनंती मंजुर करता येणार नाही. एकंदरीत वस्तुस्थिती व समोर आलेल्या पुराव्यावरुन वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्यात वाद मिळकतीच्या सरस निरस मानाने वाटण्या झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे त्याने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे असे म्हणता येणार नाही. तसेच न्यायाचा समतोल त्याच्या बाजुने झुकतो आहे असेही दिसुन येत नाही व त्यास अपरिमीत हानी पोहोचेल असेही दिसुन येत नाही. या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्याय ठरणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी ५ नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाविषयी दाव्या अंतिम निकालावेळी विचार करण्यात येईल.

स्वाक्षरीत

दिनांक १५/१२/२०१७

स. दि. कमलाकर
सह दिवाणी न्यायाधीश
क.स्तर, बदनापूर.